दै. गोदातीर दि. 18.01.2025



# दिनकर शेवाळे हत्या प्रकरणात दोघांना जन्मठेप

नांदेड (प्रतिनिधी)– नायगाव तालुक्यातील मांजरम गटाचे माजी जिल्हा परिषद सदस्य दिनकर शेवाळे यांचा खून करून भाग्यनगर पोलीस ठाण्यात स्वतः हजर झालेल्या दोन आरोपींना येथील जिल्हा न्यायाधीशांनी दि. १७ रोजी जन्म ठेप आणि प्रत्येकी १५ हजार रुपये रोख दंड अशी शिक्षा ठोठावली.

पुयणी शिवरोडवरील देशमुख कॉलनी येथे दिनकर शेवाळेचा खून दि. २६ डिसेंबर २०१७ रोजी कासारखेडा येथील डॉ. अविनाश व्यंकटराव शिंदे (वय ४५) आणि त्याचा मित्र पिंपरखेड (ता. हदगाव) येथील सखाराम नारायण कुंभकर्णे (वय २२) हे दोघे भाग्यनगर पोलीस ठाण्यात हजर झाले होते. दिनकर शेवाळेच्या पत्नी सिंधू दिनकर शेवाळे यांनी दिलेल्या फिर्यादीप्रमाणे दिनकर शेवाळे यांनी डॉ. अविनाश शिंदेकडून ४० लाख रुपये उसणे घेतले होते. ती रक्कम व्याजासकट परत केली. पण त्यानंतरही डॉ. अविनाश शिंदे आणि त्यांचे काही



सहकारी पैशासाठी घरी येऊन धमकी देत होते.

पुयणी शिवरोडवर घराच्या बांधकाम वर २५ डिसेंबर रोजी दिनकर शेवाळे तेथे झोपायला गेले आणि दुसऱ्या दिवशी सकाळी दिनकर शेवाळे रक्ताच्या थारोळ्यात आढळून आले.

दिनकर शेवाळेचा डॉ. अविनाश शिंदे आणि सखाराम कुंभकर्णे यांनी धारधार शस्त्राने झोपेत असतांना त्यांच्या डोक्यावर, पोटावर, पाठीवर, मानेवर अशा विविध ठिकाणी वार करून त्यांचा खून केला होता. हल्लेखोर आलेल्या एका कारमध्ये आणि दुचाकीवरुन पसार झाले होते. मात्र दोन्हीही आरोपी भाग्यनगर पोलिस ठाण्यात स्वतःहून हजर झाले होते.

सिंधू दिनकर शेवाळे यांच्या फिर्यादीवरून लिंबगाव पोलिसांनी डॉ. अविनाश शिंदे आणि सखाराम कुंभकर्णे विरुध्द भारतीय दंड संहितेच्या कलम ३०२, ३४ सोबत अनुसूचित जाती जमती अत्याचार प्रतिबंधक कायद्यातील कलम ३(२) (५) प्रमाणे गुन्हा क्रमांक ९३/२०१७ दाखल केला. या गुन्ह्याचा तपास तत्कालीन उपविभागीय पोलीस अधिकारी तथा सध्या हिंगोली येथे अतिरिक्त पोलीस अधिक्षक असलेल्या अर्चना पाटील यांच्याकडे देण्यात आला. अर्चना पाटील यांनी दोन्ही आरोपींना अटक करून सखोल तपास करून डॉ. अविनाश शिंदे आणि सखाराम कुंभकर्णे विरुध्द नांदेड जिल्हा न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

हा खटला अॅट्रॉसिटी स्पेशल केस क्रमांक ७/२०१८ नुसार सुरू झाला. या खटल्यात एकूण १४ साक्षीदार तपासण्यात आले. या प्रकरणात डॉ. अविनाश शिंदे आणि सखाराम कुंभकर्णे यांना पळतांना पाहणारी महिला साक्षीदार महत्वाची ठरली.

उपलब्ध झालेल्या पुराव्याला अत्यंत उत्कृष्टपणे छाननी करत अतिरिक्त सत्र न्यायाधीशांनी डॉ. अविनाश व्यंकटराव शिंदे आणि सखाराम नारायण कुंभकर्णे या दोघांना भारतीय दंड संहितेच्या कलम ३०२, ३४ नुसार आजन्म कारावास आणि प्रत्येकी १० हजार रुपये रोख दंड अशी शिक्षा ठोठावली. कलम ४५२, ३४ नुसार या दोघांना तिन वर्ष सक्त मजुरी आणि प्रत्येकी ५ हजार रुपये शिक्षा ठोठावली. दोन्ही शिक्षा आरोपींना एकत्रित भोगायच्या आहेत. दंडाची ३० हजार रुपये रक्कम जमा झाल्यानंतर, अपील मुदत संपल्यानंतर ती ३० हजार रुपये रक्कम फिर्यादी सिंधू दिनकर शेवाळे यांना देण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. या खटल्यात सरकार पक्षाच्यावतीने जिल्हा सरकारी अभियोक्ता अॅड. रणजित देशमुख यांनी बाजू मांडली.